# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

**जा.क्र./मनपा/उदयान/मिरारोड/ ४३१ /२०२५-२६** **दिनांक: १८ /०८ /२०२५**

**प्रति,**
**सिस्टम मॅनेजर,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय — संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**
**(विकास कामात बाधित व धोकादायक झाड मुळासहित काढणेकामी)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामात बाधित झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

**(नागेश विरकर)**
**वृक्ष अधिकारी**
**प्रभाग समिती क्र.४,५ व ६**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

**जा.क्र./मनपा/उद्यान/मिरारोड/ ४३१ /२०२५-२६** **दिनांक: १८/०७/२०२५**

**// जाहीर नोटिस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, प्रत्यक्ष पाहणी केली असता झाडे काढणे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अंदाजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | निलगिरी | ३५ ते ४० फुट | ०१ | २१ वर्ष | "मिरा रोड (पूर्व), हटकेश उद्योग नगर, मिरा-भाईंदर रोड येथील पॉश कॉम्प्लेक्स को.ऑ.हौ.सो.लि.च्या आवारात एक निलगिरीचे झाड आहे. सदर झाड मंदिराच्या भिंतीला टेकलेले असून त्या भिंतीला पडझड होण्याची शक्यता आहे. मंदिर परिसर असल्यामुळे नागरिकांची तेथे मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या कारणास्तव सदरचे झाड काढणे आवश्यक आहे." **अॅड. हितेश सिंग, युवासेना विधानसाभा सचिव यांचे दि.२६/०६/२०२५ रोजीचे पत्र..** |
| २ | बदाम | ०८ ते १० फुट | ०१ | ०८ वर्ष | मिरा भाईंदर क्षेत्रातील भाईंदर (पू.) प्रभाग समिती क्र.१० मधील गोडदेव तलाव येथे सुशोभिकरणांचे काम सुरू असुन सदर कामामध्ये तलावा लगतच्य विहिरीजवळ म्युझिकल फाउंटनसाठी कंट्रोल रुमचे बांधकाम करावयाचे आहे. सदर कामामध्ये झाड ०१ बदामाचे झाड बाधित होत असुन या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **मा. उप-अभियंता(साबां/विद्युत) यांचे दि.१५/०७/२०२५ रोजीचे पत्र.** |
| | | **एकुण** | | | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**(नागेश विरकर)**
**वृक्ष अधिकारी**
**प्रभाग समिती क्र.४,५ व ६**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**